**A**

**SL. No. : G**

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 47 ]
Total No. of Questions : 47 ]

**CCE RR**
**REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **85-M**

**Code No. : 85-M**

# ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ

# Subject : SOCIAL SCIENCE

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ/ New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 26. 06. 2019 ] [ Date : 26. 06. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 9-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80 ] [ Max. Marks : 80

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 47 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

I. खालील प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडून त्याच्या इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर दिलेल्या उत्तर पत्रिकेमध्ये लिहा : $10 \times 1 = 10$

1. युरोपियन देशांच्या व्यापारावर या व्यापाऱ्यांची मक्तेदारी होती.

   (A) इटलीच्या व्यापाऱ्यांची

   (B) अरब व्यापाऱ्यांची

   (C) फ्रेंच व्यापाऱ्यांची

   (D) भारतीय व्यापाऱ्यांची.

2. 'दत्तक वारसा नामंजूर' याची ओळख करुन देणारा ब्रिटीश गव्हर्नर जनरल

   (A) लॉर्ड वेलस्ली

   (B) लॉर्ड कॉर्नवॉलिस

   (C) लॉर्ड डलहौसी

   (D) लॉर्ड विल्यम बेंटिक.

3. शीत युद्ध झालेल्या राष्ट्रांचा योग्य गट हा आहे

   (A) अमेरिका ( यू. एस. ए. ) – चीन

   (B) चीन – सोवियत रशिया

   (C) अमेरिका ( यू. एस. ए. ) – जपान

   (D) अमेरिका ( यू. एस. ए. ) – सोवियत रशिया.

4. ताश्कंद येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या कराराचे वर्ष

   (A) 1962 (B) 1963

   (C) 1965 (D) 1966.

5. असंघटित क्षेत्राचे एक लक्षण हे आहे.

   (A) कामगार

   (B) स्थलांतर

   (C) मजूर

   (D) वेतन ( मजुरी ) रहित कामगार.

6. भारतातील सर्वात उंच शिखर हे आहे.

(A) हिमालय

(B) गौरी शंकर

(C) माऊंट ऐव्हरेस्ट

(D) गॉडविन ऑस्टीन / के2.

7. खालील पैकी या अरण्यातील वनस्पतींच्या फांद्याना पारंब्या ( मुळ ) फुटतात.

(A) सदाहरित अरण्ये (B) मान्सून अरण्ये

(C) मँग्रोव्ह अरण्ये (D) पर्वतीय अरण्ये.

8. एक वर्षाच्या मुदतीत त्या देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांची किंमत म्हणजे

(A) राज्याचे उत्पन्न (B) राष्ट्रीय उत्पन्न

(C) राज्य आणि राष्ट्रीय उत्पन्न (D) दरडोई उत्पन्न.

9. टेलीशॉपींग म्हणजे

(A) घरी बसून व्यापार करणे

(B) आंतरराष्ट्रीय स्थरावर व्यापार करणे

(C) स्वदेशी ( घरगुती ) व्यापार

(D) किरकोळ व्यापार.

10. अन्न आणि कृषीविषयक संघटनेचे ( FAO ) मुख्य कार्यालय या ठिकाणी आहे.

(A) रोम (B) नवी दिल्ली

(C) न्युयॉर्क (D) जिन्हेवा.

II. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 14 × 1 = 14

11. ब्रिटिशानी स्वतःच्या स्वार्थासाठी भारतात राजकोय अधिकार कसा स्थापन केला ?

12. बंगालच्या फाळणीचे कारण कोणते ?

13. आर्थिक निःसारणाच्या सिद्धांताचे संस्थापक कोण ?

14. ब्रिटिशांच्यात टिपू विरुद्ध द्वेषाची भावना का वाढली ?

15. हलगलीच्या बेरडानी ब्रिटिशांच्या विरुद्ध का बंड पुकारले ?

16. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सतत संघर्ष होण्याचे कारण काय ?

17. शांत दरी चळवळ ( सायलेंट व्हॅली आंदोलन ) झालेले ठिकाण कोणते ?

18. लाल माती कशी बनते ?

19. कोणत्या अरण्यात चंदन वनस्पतीची वाढ होते ?

20. मँगनीजला मिश्र धातू ( ferro-alloy ) असे का म्हणतात ?

21. केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर ( GST ) का लागू केला ?

22. आजच्या दिवसात ग्राहकांचे संरक्षण करणे का महत्वाचे आहे ?

23. जमाव म्हणजे काय ?

24. अरण्ये सदा हिरविगार राहण्याचे मुख्य कारण कोणते ?

III. खालील प्रश्नांची प्रत्येकी **दोन** ते **चार** वाक्यात उत्तरे लिहा : 15 × 2 = 30

25. वेलस्लीच्या काळात ब्रिटिशानी आपल्या साम्राज्याचा विस्तार कसा केला ?

**किंवा**

आँग्लो-शिख युद्धाचे परिणाम कोणते ?

26. 'स्वामी विवेकानंद हे तरुणांचे प्रेरणा स्थान होते.' कसे ?

27. 1857 च्या बंडाला राजकोय घटक कसे प्रेरित ठरले ?

28. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषावार राज्यांची पुनर्रचना करणे अनिवार्य झाले. स्पष्टीकरण द्या.

29. जर्मनीच्या पराभवाला हिटलर कसा कारणीभूत ठरला ?

30. भारत शांतता प्रिय राष्ट्र असून मर्यादीत निःशस्त्रीकरणाचे समर्थन करतो. का ?

31. कोणते घटक मानवी हक्कांच्या चळवळीसाठी प्रेरणादायक ठरले ?

32. भूक-सूची कशी ओळखाल ?

33. भारताचे हवामान हे प्रदेशानुसार व ऋतूमानानुसार बदलत जाते. या वाक्याचे समर्थन करा.

34. विकसनशील राष्ट्रानां जल साधन संपत्ती ही फार महत्वाची आहे. कशी ?

35. दुरसंवेदी तंत्रज्ञान कसे उपयोगाचे आहे ?

36. कमी मृत्यू दर हा लोकसंख्या वाढीसाठी कसा जबाबदार आहे ?

37. विकसनशील देशात फास्ट फूड पद्धतीने आरोग्य कसे नष्ट होत आहे याचे वर्णन करा.

38. महिला सबलीकरण कसे साध्य कराल ?

39. भारतीय शेतकऱ्यांच्या विकासासाठी फुलांची शेती कशी उपयोगाची आहे ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा** वाक्यात लिहा : 6 × 3 = 18

40. जमीन महसूल पद्धतीचे भारतीय शेतकऱ्यांवर कसे परिणाम झाले ?

**किंवा**

ब्रिटिशांविरुद्ध कित्तूर मधून झालेल्या बंडाचे वर्णन करा.

41. द्रारिद्रयाचे निर्मूलन करण्यासाठी सरकारने कोणते उपाय हाती घेतले आहेत ?

**किंवा**

संयुक्त राष्ट्रसंघटनेची ( UNO ) सफलता कोणती ?

42. अस्पृश्यतेच्या निर्मूलनासाठी केलेले घटनात्मक उपाय कोणते ?

**किंवा**

असंघटित क्षेत्रातील कामगारांपुढील सामाजिक आणि आर्थिक आवाहने कोणती ?

43. लोखंड आणि पोलाद उद्योग धंद्याच्या स्थायीकरणासाठी कोणते घटक आवश्यक आहेत ?

**किंवा**

महापूराची कोणतीही सहा कारणे सांगा.

44. भारतीय रिझर्व बँक आपल्या कार्यक्रमामधून देशाच्या चांगलेपणासाठी कशी कष्ट घेते ?

**किंवा**

सरकार कराशिवाय महसूल कसा जमा करते ?

45. बचत बँक खाते आणि चालू बँक खाते यांच्यातील फरक सांगा.

**किंवा**

एकता कपूर आणि किरण मजुमदार शहा यानी संपादित केलेले यश कोणते ?

V. खालील प्रश्नाचे उत्तर **आठ (8)** ते **दहा (10)** वाक्यात लिहा : 4

46. गांधीजींच्या असहकार चळवळीतील प्रमुख कार्यक्रमांचे वर्णन करा.

VI. 47. भारताचा नकाशा काढा आणि खालील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

a) कांडला

b) दिग्बोई

c) कन्याकुमारी.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 47 च्या ऐवजी )**

नदीखोऱ्यातील बहुउद्देशीय योजनेचे उद्देश कोणते ? 4